म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २३८.

हाराष्ट्राचा

# ...तिलक गेला !

कवि–श्रीयुत विश्वराज.

प्रकाशक--शांताराम रा. सद्रे,
गिरगांव–मुंबई.

REFBK-0019442
REFBK-0019442

...र्धा आणा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# महाराष्ट्राचा सौभाग्यतिलक गेला !

[ चाल—उद्धवा शांतवन कर जा. ]

निर्धार महाराष्ट्राचा । विमलभाव ओतित होता
विदित काळ हृदयालाही । मिळणार आपणा गेता
ती हांक लोकहृदयाची । तो धावा भारत भूचा
होणार विफल जनहृदया । स्पर्शही न या शंकेचा
परि दैवहि निष्ठुर झाला
पाठवी पुनरपी काळा ।
चुकवुनी जागता डोळा ।
सौभाग्य महाराष्ट्राचें । घेउनी जाहला जाता ॥ १ ॥
गोखले रानडे दादा । दरबारीं नव्हते काय ?
गतधवा आर्य रमणीला । करुनि त्या लाभलें काय ?
स्वातंत्र्य-मूळ हें खुडुनी । करि विदिर्ण भारत-हृदय
अवतार कर्मयोगाचा ।
निश्वास हिंद राज्याचा ।
कीं शेष-तंतु आशेचा ।
इतुकाहि निष्ठुरें खुडिला । हा ! कसल्या स्वार्थाकरितां ॥२॥

REFBK-0019442
REFBK-0019442

गिरिदरींत स्वातंत्र्याचा । प्रतिनादित होता नाद
त्या मूक भावना झाल्या । वाचाळ घालिती साद
तो काळ दिव्य शिवबाचा । परि हृदया शाश्वत याद
अटकेवरि झेंडा भगवा ।
नाचवीत घेउनि जावा ।
गाजिच्या कुळीं त्या यावा ।
रणभीरू दुमरा बाजी । ये परवशता मग राष्ट्रा ॥ ३ ॥
परवशता कारागारीं । ढाळीत अश्रु संमर्द
ही भारत–माता होती । नच सौख्यभोग तिज सुखद
चहुंकडे दिसे अंधार । घुबडांचा भेसुर नाद
इतुक्यांत दीप्तिचा तारा ।
करि तिचा चेहरा हंसरा ।
चिंतेचा नुरत पसारा ।
आश्वासुं लागली धैर्यं । त्यावरीच सारी ममता ॥ ४ ॥
देवीला देउनि धीर । सरसावे वीरहि पुढतीं
" जन्मसिद्ध स्वातंत्र्याचा । हक्क का सांगण्या भीती

कृष्ण वा श्वेत हा भेद । ही तुमची शासन रीती ”
नरकेसरि गर्जे स्पष्ट ।
करि जागृत सारें राष्ट्र ।
देव हा काय व्रत भ्रष्ट ।
चालता होय स्वर्गांत । निज शापावधि ओसरता ॥ ५ ॥

या भारत भूमीसाठीं । शिणविला आपुला देह
जडतेस दिलें चैतन्य । दाखवुनी सोज्वल ध्येय
कारागृहवासहि अपुलें । मानिलें सुखानें गेह
ध्येयाच्या मार्गी आणी ।
ही पावन भारत-रमणी ।
मध्येंच परी सोडोनी ।
सौभाग्यतिलक गेलाना । अनपेक्षित स्वर्गप्रांता ॥ ६ ॥

किति रडशिल भारतमाते । रडण्याचे दिन हे आले
फोडुनी अखंडित टाहो । वद टिळक रत्न कीं गेलें
असहाय्य अससि या पुढतीं । दुर्दैव तुझें ओढवलें !

धृत कार्य पूर्तता व्हाया ।
सामर्थ्य सुतां तव द्याया ।
बल आळविं तूं प्रभुराया ।
लोकमान्य आशिर्वादें । तव स्वराज्य येइल हाता ॥ ७ ॥

वन्देमातरम् ।

REFBK-0019442
REFBK-0019442

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
ना. ......
ठाणे.